**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ३</u>**

**निशाणी क्र.५९**

शपथेवर कथन करते की,

नाव – **संजय पंढरीनाथ घोरपडे,**

वय – ५६ वर्षे, कामधंदा – सहा.फौजदार, नेवासा पो.स्टे.

रा. – नेवासा ता. नेवासा जि. अहिल्यानगर.

**सरतपास – अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री. पी. डी. रणधीर –**

०१. दि. २४.०१.२०१३ रोजी मी पो.कॉ म्हणून कोपरगाव शहर पो.स्टे. ला कार्यरत होतो. वरील कालावधीत मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मुंबई पोलिस अधिनियम कलम ३७–३ अन्वये शस्त्रात्र व जमावबंदीचा आदेश पारित केला होता. सदर दिवशी मी पो.स्टे मध्ये कर्तव्यावर हजर होतो. त्या दिवशी सहा. पोलिस उपनिरीक्षक पवार साहेब यांनी मला व पीएसआय पवार, पो.कॉ. पवार, पोलीस नाईक आव्हाड, पो.कॉ. काशिद यांना बोलवून सांगितले की, शिवाजी पुतळा, कोपरगाव येथे बजरंग दल व भारतीय जनता पार्टीच्या लोकांनी जमाव केला आहे. मा. मंत्री श्री. सुशिलकुमार यांच्या बद्दल मुरदाबाद च्या घोषणा देत आहेत तेथे जावून कारवाई करा. त्यांनतर आम्ही सर्व मोटरसायकलवर सदर ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी मा. सुशिलकुमार यांच्या पुतळयाचे दहन केले होते. त्या सर्वांनी तहसिलदार साहेब, कोपरगाव यांना जावून निवेदन दिले. सदर घटनेबददल पो.कॉ. काशिद यांनी सर्व लोकांविरुदध पोलिसात फिर्याद दाखल केली. माझा जबाब नोंदविण्यात आला होता. न्यायालयासमोर असलेल्या आरोपींना मी ओळखतो. ते तेच आहेत. फिर्यादी पो.कॉ. काशिद हे आज रोजी मयत झालेले आहेत. गैरहजर आरोपी मला दाखविल्यास मी त्यांना ओळखू शकतो. नि. ५७ वरील आदेशान्वये आरोपी क्र. २ ची गैरहजेरी माफ करण्यात आलेली आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास – आरोपीं तर्फे श्री. एस.एस. मंडलिक वकील साहेब –**

०२. शिवाजी महाराज पुतळा व पो.स्टे. यांचे दरम्यान १०० मिटर अंतर आहे.

सदर ठिकाणी मोटरसायकलने पोहचण्यसाठी १.५० ते २.०० मिनीटे वेळ लागतो. शिवाजी पुतळ्या जवळ चौफुली आहे हे म्हणणे खरे आहे. सदरचा परिसर हा कोपरगाव शहरातील मुख्य्य बाजारपेठेचा चौक आहे हे म्हणणे खरे आहे. सदर ठिकाणी मोठया प्रमाणात लोकांची वर्दळ असते हे म्हणणे खरे आहे. मा. सुशिलकुमार शिंदे यांचा पुतळा जाळताना व घोषणा देताना मी स्वतः कोणाला बघितले नाही हे म्हणणे खरे आहे. मी सर्व आरोपींना ओळखत नाही. आरोपी हे बजरंग दल अथवा भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आहेत किंवा कसे याची मला माहिती नाही हे म्हणणे खरे आहे. घटनास्थळावरुन कोणालाही अटक करण्यात आली नव्हती हे म्हणणे खरे आहे. मी अधिका–यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. मला आरोपीचे नाव सांगता येणार नाही.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR

Digitally signed by SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR

(संजय छ. खैरनार)

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

दिनांक – १२.०२.२०२६

कोपरगाव, जि. अहमदनगर

(एस. सी. खैरनार )

दिनांकः १२.०२.२०२६

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. २**

**निशाणी क्र.५८**

शपथेवर कथन करते की,

नाव – **सुभाष बाबाराव आव्हाड,**

वय – ५८ वर्षे, कामधंदा – पोलीस उपनिरिक्षक, नगर पो.स्टे.

रा. – अहिल्यानगर, ता.जि. अहिल्यानगर.

**सरतपास – अभियोग पक्षातर्फे सहा.सरकारी वकील श्री. पी. डी. रणधीर –**

०१. दि. २४.०१.२०१३ रोजी मी पो.ना म्हणून कोपरगाव शहर पो.स्टे. ला कार्यरत होतो. वरील कालावधीत मा. जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांनी मुंबई पोलिस अधिनियम कलम ३७–३ अन्वये शस्त्रात्र व जमावबंदीचा आदेश पारित केला होता. सदर दिवशी मी पो.स्टे मध्ये कर्तव्यावर हजर होतो. त्या दिवशी सहा. पोलिस उपनिरीक्षक पवार साहेब यांनी मला व पीएसआय पवार, पो.कॉ. पवार, पो.कॉ. घोरपडे, पो.कॉ. काशिद यांना बोलवून सांगितले की, शिवाजी पुतळा, कोपरगाव येथे बजरंग दल व भारतीय जनता पार्टीच्या लोकांनी जमाव केला आहे. मा. मंत्री श्री. सुशिलकुमार यांच्या बददल मुरदाबाद च्या घोषणा देत आहेत तेथे जावून कारवाई करा. त्यांनतर आम्ही सर्व मोटरसायकलवर सदर ठिकाणी गेलो. सदर ठिकाणी मा. सुशिलकुमार यांच्या पुतळयाचे दहन केले होते. त्या सर्वांनी तहसिलदार साहेब, कोपरगाव यांना जावून निवेदन दिले. सदर घटनेबददल पो.कॉ. काशिद यांनी सर्व लोकांविरुदध पोलिसात फिर्याद दाखल केली. माझा जबाब नोंदविण्यात आला होता. न्यायालयासमोर असलेल्या आरोपींना मी ओळखतो. ते तेच आहेत. फिर्यादी पो.कॉ. काशिद हे आज रोजी मयत झालेले आहेत. गैरहजर आरोपी मला दाखविल्यास मी त्यांना ओळखू शकतो. नि. ५७ वरील आदेशान्वये आरोपी क्र. २ ची गैरहजेरी माफ करण्यात आलेली आहे.

सरतपास पुर्ण.

**उलटतपास – आरोपीं तर्फे श्री. एम.एस. खिल्लारी वकील साहेब –**

(एस. सी. खैरनार )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.

दिनांकः १२.०२.२०२६

०२. शिवाजी पुतळया जवळ चौफुली आहे हे म्हणणे खरे आहे. सदरचा परिसर हा कोपरगाव शहरातील मुख्य बाजारपेठेचा चौक आहे हे म्हणणे खरे आहे. सदर ठिकाणी मोठया प्रमाणात लोकांची वर्दळ असते हे म्हणणे खरे आहे. मा. सुशिलकुमार शिंदे यांचा पुतळा जाळताना मी स्वतः कोणाला बघितले नाही हे म्हणणे खरे आहे. आरोपींशी माझा पुर्वीचा कोणताही परिचय नाही हे म्हणणे खरे नाही. आरोपी हे बजरंग दल अथवा भारतीय जनता पक्षाचे कार्यकर्ते आहेत किंवा कसे याची मला माहिती नाही हे म्हणणे खरे आहे. घटनास्थळावरुन कोणालाही अटक करण्यात आली नव्हती हे म्हणणे खरे आहे. मी अधिका–यांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही. मला आरोपीचे नाव सांगता येणार नाही.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR Digitally signed by SANJAY CHHAGANRAO KHAIRNAR

(संजय छ. खैरनार)

अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,

दिनांक – १२.०२.२०२६ कोपरगाव, जि. अहमदनगर

(एस. सी. खैरनार )
दिनांकः १२.०२.२०२६ अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, कोपरगाव.